नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/१०/२०२५ ( रविवार )

## ड्रोन कॅमेऱ्याद्वारे द्वारे पेट्रोलींग करून जेसीबी च्या सहाय्याने कारवाई करत मोहाफुल हातभट्टीची दारू काढुन विक्री करणाऱ्या ०५ आरोपीतांवर गुन्हे नोंद, १ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर, कळमेश्वर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची संयुक्त कारवाई

दिनांक ०५/१०/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील गौंडखैरी बरड येथे मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी दंगा नियंत्रण पथकासह संयुक्तरित्या कारवाई करत **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन जेसीबी च्या सहाय्याने मोहफूल गावठी दारू भट्टयांवर कारवाई केली. २ पुरूष आणि ३ महीला आरोपी हे अवैध्यरीत्या मोहफूल गावठी दारू बनवितांना व विक्री करतांना मिळून आल्याने आरोपीतांवर गुन्हे नोंद केले.**

**.नमुद कारवाई मध्ये २०० लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू किंमती २०,००० /— रूपये, ३,४०० लिटर मोहाफुल सडवा किंमती १,१९,००० /— रूपये, लोखंडी ड्रम ,प्लॅस्टिक ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण १,५०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**


JCB





## ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द केली कारवाई

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०४/१०/२०२५ रोजी नरखेड पोलीस हे अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी ड्रोन द्वारे पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना मौजा मोहदी धोत्रा शिवारात मोकळया जागेत काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना दिसुन आहे. नरखेड पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन सापळा रचुन धाड टाकुन आरोपी नामे १) प्रविण प्रभुजी पंचभाई, वय ४० वर्षे, रा.पिपंळगांव ता. नरखेड, २) यादवराव गणपतराव अलोने, वय ४२ वर्षे, रा. बेलोना ता. नरखेड, ३) राजकुमार धनराज गजभिये,वय ४० वर्षे, रा.नरखेड, ४) नरेश भाउराव सावरकर, वय ३२ वर्षे ,रा.बेलोना, ता नरखेड,५) आकाश नरहरी पंचभाई, वय ३२ वर्षे, रा. पिपळंगाव वखाजी, ता.नरखेड,यांना जागीच ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना पकडले.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते, रोख रक्कम २५,३००/— रूपये, घटनास्थळावरील मो.सा सि.डी १०० क्रमांक एम.व्ही.आय. ५३६२, हिरो होंडा डिलक्स मो.सा क्रमांक एच एच २७ झेड २८४० आणि इतर साहीत्य असा एकुण कि १,४६,१८० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीतांविरूध्द महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.





**अवैधरित्या देशी , मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई**
**१८ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद. एकूण २,८४,४०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त**

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०४/१०/२०२५ रोजी दारूबंदी कायदाअंतर्गत विविध पोलीस स्टेशन नरखेड — ०२ गुन्हे ,केळवद —०३ गुन्हे, खापा —०१ गुन्हे , कळमेश्वर —०८ गुन्हे, रामटेक —०२ गुन्हे, देवलापार —०२ गुन्हे अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन ५०१ लिटर मोहाफुल दारु,५००० लिटर रसायन सडवा आणि इतर साहीत्य असा एकुण २,८४,४०० /— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त करण्यात आला आहे. १८ आरोपीतांवर १८ गुन्हे दाखल केले आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने